# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी ISO ९००१-२००८ प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
## भुमि आणि जिंदगी विभाग
दुरध्वनी क्र. : ०२०-६७३३१५३७ E-mail : Landestate@pcmcindia.gov.in
फॅक्स क्र. : ०२०-२७४२५६०० Website : www.pcmcindia.gov.in


जा.क्र.भूजि/ ०९ /कावि/ १२ /२०२२ दि. १७/०१ /२०२२

विषय : रसवंतीगृह / निरा विक्रीसाठी जागा भुई भाडयाने देणेबाबत....

परिपत्रक,

दरवर्षी मनपा क्षेत्रातील नागरीकांना महापालिकेच्या जागा रसवंतीगृह व निरा विक्री करिता मनपाचे क्षेत्रीय कार्यालय स्तरावर भुईभाडयाने देणेत येतात. सन २०२२ पासून पुढील ०५ वर्षे कालावधीकरीता मूळ दरात प्रती वर्षी १२.५% वाढ करून सदरकामी जागा भाड्याने देणेबाबत अटी व शर्तीचा तपशिल खालील प्रमाणे-

१. सदर जागा १ जानेवारी २०२२ ते ३० जून २०२६ या हंगामी कालावधीसाठी भुईभाड्याने देणेत याव्यात व सदर कालावधीचे (६ महीने) भाडे अगाऊ स्वरुपात भरून घेण्यात यावे व त्यानंतर जागा ताब्यात देणेत यावी व यापुढील ०५ वर्षे कालावधीसाठी याच पद्धतीने कार्यवाही करावी.

२. रसवंतीगृहाच्या व्यवसायासाठी १०X१५ चौ. फुट मापाची जागा व निरा विक्री स्टॉलसाठी कमाल ५X५ चौ. फुट मापाची जागा देणेत यावी.

३. सदरकामी आकारावयाचा मासिक भाडे दर व अनामत रक्कम याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे,

| अ.क्र. | तपशिल | भाडे दर र.रु. | GST १८% | अनामत र.रु. |
|---|---|---|---|---|
| १. | रसवंती गृह | ५०००/- प्रति महा | ९००/- | ५०००/- |
| २. | निरा विक्री केंद्र | २२००/- प्रति महा | ३९६/- | २०००/- |

४. भाडे कालावधी मुदत संपल्यानंतर व्यवसायातील जागेचे शेड / स्टॉल काढून जागा स्वच्छ करुन मनपाच्या जागा ताब्यात द्यावी.

५. विक्रेत्यांना सदरची जागा तात्पुरत्या कालावधीसाठी दिलेली असल्याने मनपास नगर नियोजनाच्या विकास कामासाठी सदर जागेची गरज भासल्यास त्वरीत खाली केली जाईल असे अर्जदाराकडून र.रु. १००/- च्या स्टॅम्पवर हमी पत्र भरुन घ्यावे.

६. महापालिकेची परवानगी न घेतल्यास व अनाधिकृत जागेचा वापर करणा-या विरुध्द त्वरीत दंडात्मक कारवाई करावी. व अतिक्रमण विभागाकडून जागा ताब्यात घ्यावी.

७. रसवंती / निरा विक्री केंद्रासाठी जागेचा वापर ठरलेल्या व्यवसायासाठीच व ठरलेल्या ठिकाणी करण्याचे व्यवसायिकावर बंधन असावे. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे त्याठिकाणी विजेचे कनेक्शन, पाणी इ. विक्रेत्यांनी स्वखर्चाने घ्यावयाचे आहे. तसेच देय असणारे मनपा १८ % जीएसटी शुल्क तावा दिल्यापासून ३० दिवसात संबंधित कार्यालयात भरणे आवश्यक राहील व आवश्यक ते मनपा / शासन परवाने अन्न परवानासह स्वखर्चाने घेणे आवश्यक आहे.

८. भाडयाने दिलेल्या जागेची मनपास गरज भासल्यास ७ दिवसाची पुर्वसुचना देऊन व्यवसायिका- कडून जागा खाली करुन घेणेचा मनपास अधिकार राहील. त्यासंबंधि कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

९. मनपाने मंजूर केलेल्या व्यक्तीसच जागा वापरता येईल. सदरची जागा पोट भाडयाने देता येणार नाही. तसे आढळल्यास जागेचा तावा मनपा काढून घेईल.

१०. मनपाने वेळोवेळी केलेले नियम,उपविधी,विनीमय जागा भुईभाडयाने घेणा-या व्यावसायिकावर बंधनकारक राहतील. हमी पत्र लिहून दिलेल्या कोणत्याही अटीचा भंग झाल्यास कोणतीही नोटीस अथवा पुर्व सुचना न देता भुईभाड्याने दिलेली जागा मनपा ताब्यात घेईल.

११. मनपाने मंजूर केलेल्या जागेपेक्षा अधिक जागा वापरल्यास अथवा शेड उभारल्यास मनपाकडे अनामत म्हणून भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल. व परवाना रद्द करण्यात येईल.

१२. जागा उपलब्ध करुन देताना ज्या ठिकाणास एकापेक्षा जास्त मागणी आल्यास क्षेत्रीय अधिकारी यांनी संबंधित अर्जावर मागणीदारांना गोपनीय पत्रे देऊन दर मागवून घेऊन आलेल्या दरामध्ये सर्वात जास्त दर देणा-या व्यवसायिकास जागा उपलब्ध करुन द्यावी.

१३. क्षेत्रीय अधिकारी यांनी त्यांचे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचेकडून रहदारीस अडथळा होणार नाही यावाबत अभिप्राय घेऊन जागा घेणेबाबतची कार्यवाही करावी.

१४. रसवंतीगृहास जागा उपलब्ध करुन देताना सदरची जागा फुटपाथवर दिली जाणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

१५. रसवंतीगृह व निरा विक्री स्टॉलमध्ये जागा मंजूर आदेशाची व अन्न परवाना प्रत दर्शनी ठिकाणी लावणेत यावी.

१६. रसवंतीगृह व निरा विक्री स्टॉल तपासणी करण्याचा अधिकार संबंधित मनपा अधिकारी व कर्मचारी यांना राहील.

१७. रसवंतीगृह व निरा विक्री स्टॉल सुरक्षेची संपुर्ण जबाबदारी जागा मागणी धारकाची राहील. कोणत्याही प्रकारची जबाबदारी मनपाची राहणार नाही.

१८. जानेवारी ते जून या कालावधीत अनाधिकृत रसवंतीगृह व निरा विक्री केंद्राचा सर्व्हे क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात यावा.

१९. फेरीवाला धोरणांतर्गत मनपाने क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग फेरीवाला समिती मार्फत जे "ना फेरीवाला क्षेत्र" निश्चित केले आहे त त्या क्षेत्रांमध्ये प्रस्तुतकामी परवाना देताना बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

२०. रसवंतीगृह जागा भुईभाडे व निरा विक्री केंद्र भुईभाडे हा महसुल क्षेत्रीय कार्यालयाकडे जमा करण्यात यावा.

२१. रसवंतीगृहातील ऊसापासून निघणारा चोथा तसेच अन्य कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधित रसवंतीगृह धारकाची राहील. सदरचा कचरा अन्य ठिकाणी इतरत्र टाकलेला आढळलेस त्याबाबत क्षेत्रिय अधिकारी यांनी संबंधीत रसवंतीगृह धारकावर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच वारंवार इतरत्र सदरचा कचरा आढळून आलेस संबंधीत रसवंती गृहाधारकाची परवानगी क्षेत्रिय अधिकारी यांनी रद्द करावी.

17/01/22

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

प्रति,

क्षेत्रीय अधिकारी,
अ,ब,क,ड,इ,फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :

१. सहा. आयुक्त, करसंकलन,
२. कार्यकारी अभियंता, स्थापत्य अ,ब,क,ड,इ,फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय,
३. कार्यकारी अभियंता, विद्युत अ,ब,क,ड,इ,फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय,
४. अग्निशामक अधिकारी, अग्निशामक विभाग,
५. मुख्य अन्न परवाना निरिक्षक, अन्नपरवाना विभाग
६. आरोग्य अधिकारी